असा. क्र. २३ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, जून ८, २००७/ज्येष्ठ १८, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३.**—महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. . . . . . . . . . २०८-२११

## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ जून २००७.

**MAHARASHTRA ORDINANCE No. III OF 2007.**

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CONTINGENCY FUND ACT.

**सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३.**

**महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९५६ चा मुंबई ४६. **आणि ज्याअर्थी,** यात पुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्यासाठी राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली आहे ;



[किंमत : रुपये ९.००]

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ याच्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २००७ असे म्हणावे.

(२) तो तत्काळ अंमलात येईल.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम २ ची तात्पुरती सुधारणा.

**२.** या अध्यादेशाच्या अंमलबजावणीच्या कालावधीमध्ये, महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम हा, जणू काही त्यातील कलम २ मध्ये, " रुपये एकशे पन्नास कोटी इतक्या रकमेचा " या मजकुराऐवजी, " रुपये पाचशे कोटी इतक्या रकमेचा " हा मजकूर दाखल करण्यात आला आहे, असे समजून अंमलात येईल. १९५६ चा मुंबई ४६.

## निवेदन

महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम, १९५६ (१९५६ चा मुंबई ४६) या अन्वये स्थापन करण्यात आलेल्या व ठेवण्यात आलेल्या राज्याच्या आकस्मिकता निधीची सध्याची मर्यादा रुपये १५० कोटी एवढी आहे.

२. न्यायालयातील भूमी संपादनविषयक प्रकरणे आणि इतर न्यायालयीन प्रकरणे यांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. ही न्यायालयीन प्रकरणे व इतर प्रशासनिक खर्च यांकरिता तातडीने रक्कम देण्याकरिता आकस्मिकता निधीमध्ये विवक्षित रक्कम असणे आवश्यक आहे. मुंबईत आणि महाराष्ट्र राज्यात गेल्या दोन वर्षात जी अतिवृष्टी झाली ती विचारात घेता, यावर्षी देखील सावधगिरीच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास, तातडीचे सहाय्य देण्यासाठी आकस्मिकता निधीमध्ये विवक्षित रक्कम उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकांना देय असलेल्या रकमांचे प्रदान करण्यासाठी आणि इतर खर्च भागविण्यासाठी रुपये ५०० कोटी एवढा निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. खर्चाच्या या बाबी "नवीन सेवा" आहेत आणि म्हणून त्या, राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. राज्य विधानमंडळाचे आगामी अधिवेशन १६ जुलै २००७ रोजी सुरू करण्याचे ठरले आहे. उपरोल्लिखित बाबींकरिता निधी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेले आदेश मात्र, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात पूरक मागण्या व विनियोजन विधेयक संमत करून त्याद्वारे, या "नवीन सेवांवरील" खर्च राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देऊन व ते विधेयक राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून प्रसिद्ध झाल्यानंतरच देता येतील. तथापि, या बाबींवरील खर्च तातडीने करणे आवश्यक असल्यामुळे तो आकस्मिकता निधीमधून आगाऊ रकमा काढूनच भागवावा लागेल.

३. आकस्मिकता निधीची सध्याची मर्यादा फक्त रुपये १५० कोटींची आहे. निकडीच्या स्वरूपाच्या विविध बाबींवरील खर्च त्यामधून भागविल्यानंतर, सध्या या आकस्मिकता निधीमध्ये रुपये १०,०९,१०,१३९ इतकी रक्कम शिल्लक आहे. वर उल्लेख केलेल्या बाबींवरील खर्च भागविण्यासाठी ही शिल्लक अपुरी आहे. म्हणून, उपरोक्त खर्च भागविण्याकरिता, आकस्मिकता निधीच्या या सध्याच्या मर्यादेत रुपये ३५० कोटींची तात्पुरती वाढ करून तो निधी रुपये ५०० कोटी इतका करणे इष्ट आहे असे वाटते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री झाली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ७ जून २००७.

**एस्. एम्. कृष्णा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व्ही. के. अग्रवाल,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.